MHAM030036912025

2984  **S.C.C./2405/2025**
**State Government Vs. Vidya & Otr.**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५१ अन्वये आरोपीस सांगावयाचा अपराधाचा तपशील अमरावती येथील मंगला दे. कांबळे, अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी क्रमांक २ यांचे न्यायालयात.</u>**

**निशाणी क्रमांकः–१०.**

| | |
|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांकः– | २५/१२/२०२१. |
| २. तक्रार दाखल केल्याचा दिनांकः– | २५/१२/२०२१. |
| ३. खबर देणा–याचे नावः– | मार्फत–गाडगेनगर पोलिस स्टेशन,<br>ता. जि. अमरावती |
| ४. आरोपीचे नाव व पत्ताः– | १.**विदया हरीशचंद्र वानखडे,**<br>वय–५४ वर्षे, धंदा– गृहीणी (कार्यकर्ता)<br>राहणार–बेलसरे फ्लोर मीलजवळ,<br>सोनल कॉलनी, शेगाव रोड, वीएमवी<br>अमरावती, ता.जि. अमरावती<br>४.**माया धर्मशील गेडाम**<br>वय–७० वर्षे, धंदा– समाजसेवा<br>राहणार–उत्तमसरा रोड, अशोक बुध्द<br>विहाराजवळ पाचबंगला गौतम नगर, जुनी वस्ती,<br>बडनेरा, ता.जि. अमरावती.<br>६.**कुंदा सुदाम सोनुले,**<br>वय–७० वर्षे, धंदा–समाजसेवा<br>राहणार–बेनोडा रोड, भोवते लेआउट,<br>अमरावती, ता.जि. अमरावती |

५. गुन्हयाचा तपशीलः–

तुम्ही दिनांक २५/१२/२०२१ रोजी, ११.०० वाजताच्या सुमारास इर्वीन चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा जवळ, अमरावती येथे सार्वजनिक ठिकाणी तुम्ही कोरोना या रोगाचा संसर्ग पसरविण्याचा संभव असताना व सदर बाब तुम्हाला माहित असतांना व तसे समजण्यास कारण असतांना तुम्ही मास्क न लावता हयगयीची कृती केली.

त्यावेळी अस्तीत्वात असलेला मा. जिल्हाधीकारी यांचे आदेशाचे उल्लंघन केले. म्हणून तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम १८८, साथीचे रोग अधिनियम कलम २, ३ व ४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम कलम ५१(बी) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला असून मी गुन्हयाची दखल घेतली आहे.

०२. वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपींनी मा. पोलीस उपायुक्त मुख्यालय, अमरावती शहर यांचे कलम ३७(१) (३) अन्वयेचे आदेशाचे उल्लघंन केले आणि त्यायोगे महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १३५ अन्वये शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असून मी गुन्हयाची दखल घेतली आहे.

**<u>आरोपीचे निवेदन</u>**

प्रश्न क्रमांक ०१ – तुम्हास कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्रमांक ०२ – तुम्हास अपराधाचा तपशील समजला काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्रमांक ०३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – होय.

१.................................

४.................................

६.................................

आरोपीची सही / अंगठा
दिनांकः–१०/०८/२०२६

समक्ष,

MANGALA DEVENDRA KAMBLE
Digitally signed by MANGALA DEVENDRA KAMBLE
Date: 2026.08.10 16:58:02 +0530

**(मंगला दे. कांबळे)**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
(कोर्ट नं. ०२),
अमरावती.

## कारणे

आरोपींनी वरील गुन्हा कबूल असल्याचे मान्य केले. त्यांनी निशानी क्र. ९ वर तशी पुरसीस सादर केली आहे. त्यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी कोणत्याही दबावास अथवा मोहास बळी न पडता गुन्हा कबूल केल्याचे दिसून येते. त्यामुळे आरोपींना वरील गुन्हयासाठी दोषी धरण्यात येत आहे. मी शिक्षेच्या मुद्दयावर आरोपींचे म्हणणे ऐकले. त्यांनी सांगितले कि, त्यांचे वर त्याचे कुटुंबाचे पालन पोषणाची जबाबदारी असून त्याची आर्थिक परिस्थीती गरीबीची आहे. त्यामुळे त्यांनी कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली. वरील परिस्थीती व गुन्हयाचे स्वरूप विचारात घेता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपींना भारतीय दंड विधानाचे कलम १८८, साथीचे रोग अधिनियम कलम २, ३ व ४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम कलम ५१(बी) अन्वये तसेच महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ नुसार दोषी धरण्यात येत आहे. |
| २. | आरोपींनी **प्रत्येकी रक्कम रूपये ५००/-(अक्षरी पाचशे रूपये मात्र)** दंड म्हणून भरावेत, दंड न भरल्यास आरोपींनी दहा दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी. |

समक्ष,

MANGALA DEVENDRA KAMBLE

Digitally signed by MANGALA DEVENDRA KAMBLE
Date: 2026.08.10 16:57:56 +0530

दिनांकः-१०/०८/२०२६

**(मंगला दे. कांबळे)**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
(कोर्ट नं. ०२), अमरावती.